Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-4315
Ta.Sonpeth Dist.Parbhani

ISSN 2319 - 359X

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
HALF YEARLY RESEARCH JOURNAL

# IDEAL

Volume - X Issue - I September - February - 2021-22

Marathi / Hindi

Peer Reviewed Refereed and
UGC Listed Journal No. 47026

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2019 - 6.601
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖
**Assit. Prof. Vinay Shankarrao Hatole**
M.Sc (Math's), M.B.A. (Mkt), M.B.A (H.R),
M.Drama (Acting), M.Drama (Prod & Dirt), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

**Ajanta Prakashan**
Aurangabad. (M.S.)

# CONTENTS OF MARATHI PART - I



| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १५ | कोवीड-१९ आणि समाजाची भूमिका<br>प्रा. बिडवे टी. एस. | ७३-७६ |
| १६ | कोवीड-१९ काळातील जिल्हा प्रशासनाची भूमिका<br>डॉ. घागलवाड जी. टी.<br>इरबतनवाड गोदावरी तुकाराम | ७७-८२ |
| १७ | कोवीड-१९ आणि प्रसार माध्यमाची भूमिका<br>प्रा. डॉ. कांबळे एम. एस. | ८३-८५ |
| १८ | कोवीड-१९ जैविक आपत्तीत जिल्हा प्रशासनाची भूमिका<br>डॉ. मुक्ता सोमवंशी | ८६-८९ |
| १९ | कोरोना-१९ काळात उद्योग जगताची भूमिका व भारतीय अर्थव्यवस्था<br>प्रा. डॉ. पी. डी. हुडेकर | ९०-९५ |
| २० | स्थानिक स्वशासनाची भूमिका<br>प्रा. डॉ. संजय संदिपान चव्हाण | ९६-९८ |
| २१ | कोरोना महामारी आणि स्थलांतर<br>डॉ. सुनिता आत्माराम टेंगसे | ९९-१०४ |
| २२ | कोरोनामुळे भारतीय अर्थव्यवस्थेवर झालेला परिणाम<br>प्रा. डॉ. अंभुरे एस. डी. | १०५-१०८ |
| २३ | कोरोना महामारीचा भारतीय समाज व्यवस्थेवर झालेला परिणाम<br>प्रविण शिवाजी धुगे | १०९-११२ |
| २४ | कोविड-१९ काळातील स्थानिक स्वराज्य संस्थांची भूमिका व विकास : एक विश्लेषणात्मक अभ्यास<br>प्रा. डॉ. परशुराम पाटील | ११३-११८ |



PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani

VOLUME - X, ISSUE - I - SEPTEMBER - FEBRUARY - 2021-22
IDEAL - ISSN - 2319 - 359X - IMPACT FACTOR - 6.601 (www.sjifactor.com)

# २२. कोरोनामुळे भारतीय अर्थव्यवस्थेवर झालेला परिणाम

प्रा. डॉ. अंभुरे एस. डी.
इतिहास विभाग, कै. रमेश वरपूडकर महाविद्यालय, सोनपेठ.

## प्रस्तावना

कोविड-19 म्हणजे असा विषय ज्या म्हणजे अगदी थोडयाच काळात देशातील बहुतांश लोक संक्रमीत झाले आणि लाखांच्या संख्येत लोकांचा बळी गेला. खूप दिवसांपासून आजपर्यंत नागरीकांना भेडसावत आहे. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर केंद्र, राज्य सरकारने घेतलेल्या संचारबंदीच्या निर्णयामुळे अनेक उद्योगधंदे, वाहतूक, निर्मिती कारखाने इत्यादी ठप्प झाली. संचारबंदीमध्ये देशातील प्रत्येक नागरीक यांमधी ललघुउद्योग, शेतमजूर, कामगार आणि वेगवेगळ्या कारखान्यांनमध्ये कामकरणारे कामगार लोकांना मोठया प्रमाणात त्रास झाला. कोविड-19 च्या रुग्णांना लागणारा खर्च हे सरकार उचलत आहे. ज्यामुळे भारतीय व्यवस्थाही बदलली आहे .त्याचा पूर्ण भाग सामान्य जनतेवर पडतानी दिसून येत आहे. संचारबंदीमुळे देशात महागाई वाढतचा ललेली आहे. तसेच, प्राथमिक गरजांसाठी लागणाऱ्या अनेक वस्तुंच्या किंमती दुप्पट झाल्या आहेत. कोरोनाची सुरूवात चीन मध्ये वुहान शहरातुन झाली. दि.01 डिसेंबर 2019 रोजी चीन मध्ये पहिला रूग्ण वुहान शहरात सापडला. या रोगाला प्रथम "कोरोना" हे नाव देण्यात आले. त्या नंतर जागतिक आरोग्य संघटना WHO ने कोरोनाला CPVID-19 व SARC-COVL असे नाव देण्यात आले. जागतिक आरोग्य संघटने 31 जानेवारी 2020 रोजी महामारी घोषीत केली. भारतात 30 जानेवारी 2020 ला केरळ मध्ये त्रिशूर येथे पहिला रूग्ण सापडला. महाराष्ट्रात दि.10 मार्च 2020 रोजी पुण्यात कोरोना रूग्ण सापडला. आणि दि. 23 मार्च 2020 पासून महाराष्ट्रात अनेक जिल्हात संचारबंदी लागु केली. शाळा, महाविद्यालय, कार्यालये, बससेवा, रेल्वे सेवा, दुकाने, बाजारे, कारखाने, उदयोगधंदे, व्यापार वाहतूक बंद झाली. यामुळे लाखो लोक रात्रदिवस प्रवास करून गावी परत आले.

संपुर्ण जगात आणि भारतात, महाराष्ट्रात कोरोना रूग्ण झपाटयाने वाढत होते. संपुर्ण देशात फार मोठी कोरोणाची दहशत निर्माण झाली होती. अशा काळात भारतात प्रत्येक राज्यानी प्रत्यके जिल्ह्यात तालुक्यात क्वारंटाईन सेंटर उभारले. त्या ठिकाणी अनेक स्वयचलित अनेक संस्थेनी अन्नदान केले. शासनाने सुध्दा फार मोठ्या प्रमाणात खर्च केला. कोरोणा रूग्नावर जसा· खाण्या, पिण्याचा, राहण्याचा खर्च केला तसेच त्यांच्या प्रत्यक्ष दवाखान्यात देखील मोठा खर्च केला.

सुरूवातीला कोरोणा आहे का नाही हे पाहण्यासाठी टेस्ट किट वापरण्यात आली. एक रूग्णाला टेस्ट खर्च जवळपास 4500 रू होत होता. याच बरोबरच विना आय.सी.यु आणि असपास नॉन क्रिटीकल कोविड-19 एक रूग्णाला खर्च जवळपास 20000 ते 25000 रू रोज खर्च ठेवले जात होता. म्हणजेच एक

रूग्णाला जवळपास 14 दिवस दवाखान्यात ठेवले जात असे किंवा आज सुध्दा आहे. यावर शासनाचे लाखो खर्च केले आहेत. प्रत्येक दवाखान्यात शासनाने वेन्टीलेंशन व्यवस्था केली होती. यामुळे सुध्दा शासनाचे लाखे रूपये खर्च झालेला आहे. त्याच बरोबर पी.पी.ई कीट वरिल खर्च फार मोठा होता. इलाज करणाऱ्या डॉक्टरांना प्रोटेक्शन डाब्विपिमेंट पी.पी.ई बार-बार बदलले अवश्यक होते. त्या मुळे प्रतिकीट 250 ते 1000 रू खर्च होत होता किंवा आज होत आहे. याच बरोबर कोरोणा रूग्णाच्या औषधाला खर्च लाखो रू झालेला आहे. या सर्व व्यतिरिक्त नविन दवाखाने उभारणे, रूग्णाच्या जेवणाचा खर्च, अबुलेंस इत्यादी खर्च धरला तर शासनावर फार मोठा आर्थिक बोजा पडलेला आहे.

कोरोना व्हायराचा उद्रेक झाल्या मुळे शेअर बाजार कोसळण्याच्या बातम्या येऊ लागल्या. परंतु अर्थव्यस्था ही फक्त शेअर बाजार, गुंतवणुकदार या पुरतीच मर्यादित नसते. तर आपल्याकडे किराणा येतो, भाज्या येतात, दुध येणे, वाहतूक हे सर्व घटक अर्थव्यवस्थेत येतात. यामुळे कोरोणाचा एकुण अर्थव्यवस्थेवर काय परिणाम झाले. आणि भविष्यात होऊ शकतो हे पाहणे आवश्यक आहे. आज प्रत्येक बसस्टॉपवर, रेल्वेस्टेशनवर, खाजगी वाहण किंवा पायी जात असेलले लाखो लोक आपल्या गावातकडे जात असणारे हे सर्व जण कोण आहेत? यातले बरेच जण हे मजूर, कारखान्यामध्ये कामगार आहेत. लॉकडॉऊन मुळे बांधकाम बंद झाले. उदयोग धंदे दुकान बंद झाली. याचा परिणाम या लोकांच्या रोजगारावर झाला. रोजगार नसल्यामुळे राहण्याच्या जागेचे भाडे, किराणा, भाज्या अशा गोष्टी विकत घेण्याची क्षमता नष्ट झाली आणि हे पुन्हा कधी सुरू होईल याची शाश्रती नसल्यामुळे अनेकांनी आपल्या घराची वाट धरली. अशी स्थितीत कॉंग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी कोरोना व्हायरसच्या साथीवर चिंता व्यक्त केली. त्यांच्या म्हणण्यानुसार या लॉकडॉऊनचा गंभीर परिणाम भारताच्या अर्थव्यवस्थेवर होईल. मृत्याचा आकडा वाढेल, बेरोजगारी निर्माण होईल. याच बरोबर जागतिक कामगार संघटनेच्या भाकिता नुसार केवळ भारताच्या नव्हे तर संपुर्ण जागतिक लोकांच्या नोकऱ्या जातील आणि तसे झाले. कोटी लोकांच्या नोकऱ्या गेल्या आहेत.

भारताच्या समग्र अर्थव्यवस्थेवरही कोरोनाचे गंभीर परिणाम झाले आहेत. भारताचा 2020 विकास 5-3 राहील असे 'मुडीज' या संस्थेने केल होत. परंतु त्या पेक्षा कीती तरी विकास दर कमी झाल्याचे दिसुन येते. अनेक अर्थिक विचारवंतानी विकास दरा सबंधी चिंता व्यक्त केली होती. भारताचे माजी प्रमुख सांख्यिकी तज्ञ प्रणव सेन यांनी भाकीत केले होते की भारताचा विकास दर 3% कमी होणार आणि 2020-21 वर्षात भारताचा अंदाजे 5 लाख कोटी फटका बसणार अगदी तसेच झाल्याचे दिसुन येते. आज भारतीची आर्थिक स्थिती खिळखिळी झाल्याचे दिसुन येते. सातत्याने विकास दर घटत आहे. आणि सातत्याने विकास दर घटत असेल तर त्यालां रिसेशन किंवा मंदी म्हणतात हिच स्थिती बराच काळ टिकली तर त्याला डिप्रेशन किंवा महामारी म्हणतात.

कोरोना व्हायरस मुळे भारताची अर्थव्यवस्था फारच खराब झाली. या मुळे घटकातील लोकांना याचा फार मोठा परिणाम भोगावा लागत आहे. ज्या फॅक्टरी मध्ये बरेच मजूर किंवा कामगार काम करत होते. परंतु फॅक्टरी बंद झाल्या मुळे कामगार बेकार होऊन त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली. कोराणा काळात आगोदरच भारताची आर्थिक स्थिती चांगली नव्हती. 2019 मध्ये भारतात 45 वर्षात सर्वात कमी उत्पन्न झाल्याचे दिसुन येत. देशाती आठ प्रमुख क्षेत्रात फक्त 5.2 एवढे उत्पादन्न् झाले. म्हणून भारत सरकारने आपल्या देशातले उत्पादन कसे वाढेल याचा पर्यंत केला पाहिजे. देशाची आर्थिक स्थिती राजकारणाशी किंवा धर्मकारणाशी जोड्ता येत नाही. नुसते दिवे लावल्याने किंवा भांडी वाजविल्याने संकट जाणार नाही. याला चीन सारखे कठारे निर्णय घ्यावे लागतील. शेतकऱ्याच्या मालाला योग्य दर किंमत दयावी लागणार. छोटया-मोठया उदयोगाला चालणा दयावी लागेल.

कोरोणा महामारीतुन आपल्याला बाहेर पडायचे असेल तर जेवढे शासनाचे कर्तव्य आहेत. तेवढेच कर्तव्य आपले देखील आहे. शासनाला मदत करणे हे कर्तव्य आहे. एका बाजुला संपुर्ण जग आणि जगाचे काम थांबले होते. संपुर्ण भारतात लॉकडॉउन होते. सचारबंदी होती, परंतु आपण त्याला जगाचा पेशिंदा म्हणतो तो शेतकरी लॉकडॉउन काळात दुध, भाजीपाला, उन्न, देण्यचे काम करत होता. पोलीस, डॉक्टर, नर्स, आरोग्य कर्मचारी, स्वच्छता कर्मचारी, शिक्षक, प्राध्यापक, अंगणवाडी सेविका ई. स्वतःच्या मुलाबाळाची व कुंटुबाची पर्वा न करता आपला जिव धोक्यात घालून अहोरात्र पर्यंत केले. कोरोणाने अनेक बळी गेलेल्या लोकांच अत्यसंस्कार देखील केले. अशा प्रकारे कोरोणाने अनेक जवळचे लोक लांब नेले तर आल्या जातीचे, धर्माचे, लोक नसणारे जवळ आले हे दिसुन आले.

समारोप

कोरोणा महामारी मुळे भारताची नव्हे तर संपुर्ण जगाची आर्थिक स्थिती बिघडली आहे. त्यात भारताची आर्थिक स्थिती तर फारच बिघडली आहे. मागील दोन वर्षा पासुन रोजगाराचा, छोटया-मोठया व्यापाराना अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. कारण खेडयात काम नाही आणि शहरातील उदयोग बंद पडल्याने अनेक लोक बेकार झाले आहेत. आज दिल्ली सारख्या ठिकाणी मागील तीन महिन्यापासून शेतकरी आपल्या हक्कासाठी आंदोलन करत आहेत. परंतु शासनाने त्यांच्या आंदोलन चिरडून टाकण्याचा पर्यंत करत आहे. शासनाने राम मंदिराचा प्रश्न हातात घेऊन मंदीर उभारण्याची जसा निधी करित आहे किवा प्रत्येक निवडणुकीत हिंन्दु, मुस्लीम वाद करण्यापैक्षा देशाला आर्थिक संकटातून आपण बाहेर निघू नसता आज पेट्रोल, डिझेल, महागाई एवढे वाढली की सर्वसामान्य लोकांना जीवन जगणे आवघड झाले आहे. याला फक्त कोरोणा महामारी जिमेदार नाही तर शासनाने व्यापारी धोरण देखील तेवढेच जिमेदार आहे. मुढभर उदयोगापतीचा फार मोठा स्वचल मिळत आहे. खाजगी करणाऱ्या नावावर संपुर्ण देशाची संपती मुठभर लोकांच्या हाती पडणार आहे. या मुळे अशा स्थितीत सर्वसामान्य माणसाने जाग्रत होऊन

देशवाचविण्याचे कार्य केले पाहिजे. जात, धर्म, पंथ विसरून देशाची आर्थिक स्थिती कशी सुधारेल यासाठी शासनाने पर्यंत केले पाहिजे.

**सेवा क्षेत्राला सरकारने मदत करावी**

जाणकरांच्या मते, उत्पादन क्षेत्रांनी थोडा वेळ पकडला आहे. मात्र सेवा क्षेत्राला तातडीने मदतीची गरज आहे. क्रिसिलचे चीफ इकॉनोमिस्टडी .के.जोशी यांच्या मते, उत्पादन क्षेत्राची गाडी रूळावर आली आहे आणि हळूहळू आगेकूच होईल. मात्र सेवा क्षेत्राला अद्यापही मागणी नाही. या क्षेत्राचा सर्वात जास्त नुकसान होत आहे. या क्षेत्राला सावरायला बराच वेळ लागेल. सेवा क्षेत्राला मदतीची आवश्यकता आहे. कारण या पडझडीस या क्षेत्राची चूक नाही. जोशी सांगतात सरकारला तुटपुंज आणि मध्यम उत्पन्न असलेल्या आर्थिक वर्गाला ही मदत करणे गरजेचे आहे. शहरी भागाला राहणाऱ्या वर्गाला याची आवश्यकता आहे. या लोकांची मिळक कशी वाढेल याकडे सरकारने लक्ष दयायला हव. त्यांना रोख पैसाही दिला जावू शकतो. अधिक उत्पन्न असणाऱ्या लोकांची मिळकत चांगली राहिली आहे. अर्थतंज्ञाच्या मते, सरकारने आणखी पैसा खर्च करायला हवा. यामुळे सरकारच्या तोटयाचा प्रमाण वाढू शकते. मात्र त्याची काळजी करायची आता वेळ नाही. सरकारने गुंतवणूक करायला हवी. सरकारची तिजोरी रिकामी राहिलयाची काळजी करू नये. लोकांच्या हातात पैसा दयायला हवा. जेणे करून ते खरेदी करूशक तील. यामुळे मागणी वाढेल व विघडलेले गणित सुरळीत करता येईल.

**संदर्भ**

1. कोरोना व्हायरस की वजह से भारत की अर्थव्यवस्था खराब हो रही है- उभगोख मुखर्जी रा साहल 2020.
2. कोरोना वैश्रिक महामारी व आर्थिक संकट- लेख 20 मार्च 2020 अमर उलेख.
3. दैनिक विविध पेपर लेख.

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani